CMYK

बीड । शुक्रवार

०४.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : ०५

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# पुढील २४ तास धोक्याचे, ८ जिल्ह्यांना हाय अलर्ट

# महाराष्ट्राच्या दिशेनं झेपावतंय मोठं संकट

● हवामान खात्यानं दिलेल्या इशाऱ्यानुसार आज राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यात आहे. गारपिटीची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

मोठी बातमी समोर येत आहे, राज्यात पुन्हा एकदा जोरदार पावसाचा इशारा हवामान विभाग कडून देण्यात आला आहे. निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे सध्या राज्यावर गारपिटीसह पावसाचं संकट घोंगावत आहे. गेल्या दोन दिवसांपासून राज्यातील अनेक भागांमध्ये पावासानं हजेरी लावली आहे. याचा मोठा फटका हा शेतकऱ्यांना बसला आहे. फळबागांचं मोठं नुकसानं झालं आहे. ऐन हातातोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावून घेतला आहे. शेतकऱ्यांचं मोठं नुकसानं झालं आहे, दरम्यान आज पुन्हा एकदा हवामान विभागाकडून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.





### ● काय आहे हवामान खात्याचा इशारा ?

हवामान खात्यानं दिलेल्या इशाऱ्यानुसार आज राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची शक्यात आहे. गारपिटीची शक्यता देखील वर्तवण्यात आली आहे. वादळी वाऱ्यासह पाऊस पडेल या काळात वाऱ्याचा वेग ताशी ४० ते ४५ किमी इतका असेल असं हवामान खात्यानं म्हटलं आहे, दरम्यान या काळात विजांच्या कडकडाटासह पाऊस पडणार असल्यानं नागरिकांनी घराबाहेर पडताना काळजी घ्यावी असं आवाहनही हवामान खात्याकडून करण्यात आलं आहे. पुढील २४ तासांमध्ये राज्यातील अनेक भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## सोलापूर हादरलं! थायलंडच्या भूकंपानंतर आता महाराष्ट्रातही ३ ठिकाणी धक्के; नागरिकांमध्ये भीती

**सोलापूर । प्रतिनिधी**

गेल्या आठवड्यात थायलंडमध्ये भूकंपाचे तीव्र धक्के बसल्याने बँकॉकसह शेजारील देशांमध्ये प्रचंड नुकसान झालं. उंच इमारती कोसळल्या, मोठी वित्तहानी झाली आणि हजारो लोकांचा बळी गेला. या घटनेचे हृदयद्रावक व्हिडिओ अजूनही चर्चेत आहेत. अशातच आता महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यातही आज भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये भीती पसरली आहे. सांगोला हे




या भूकंपाचं केंद्रबिंदू असल्याचं समजतंय. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने ट्विटद्वारे याबाबत माहिती दिली. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा या भागात आज सकाळी ११:२२ वाजता २.६ रिश्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे धक्के जाणवले. हे धक्के काही क्षणांसाठीच होते, पण त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जानी किंवा वित्तहानी झाल्याची माहिती नाही.

दुसरीकडे, महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील कोयना परिसरात सातत्याने सौम्य भूकंपाचे धक्के जाणवत असतात. या भागातही अशा घटनांमुळे लोक

▶▶ उर्वरित पान २ वर

## शरद पवारांची मोदी सरकारला साथ, लोकसभेत केलं बाजूनं मतदान! सुप्रिया सुळेंनी सांगितलं कारण

**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा अधिवेशनाच्या इतिहासात २ एप्रिल २०२५ हा दिवस ऐतिहासिक होता. या दिवशी वक्फ (संशोधन) विधेयक २०२५ वर १२ तासांपेक्षा जास्त काळ चर्चा झाली. त्यानंतर हे विधेयक लोकसभेत मध्यरात्रीनंतर मंजूर झाले. वक्फ संशोधन विधेयक मंजूर झाल्यानंतरही लोकसभेचं कामकाज सुरुच होते. मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीबाबत



विधेयक केंद्र सरकारकडून रात्री उशीरा मांडण्यात आलं. या विषयावरील चर्चेत मणिपूरमधील सामान्य परिस्थितीसाठी केंद्र सरकार सर्व प्रकारचे प्रयत्न करत आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्ट केलं. मणिपूरमध्ये गेल्या चार महिन्यांपासून कोणताही हिंसाचार झालेला नाही. मैतयी आणि कूकी समाजाशी चर्चा सुरु असून शांततेनं तोडगा काढण्याचा सरकारचा प्रयत्न सुरु असल्याचं केंद्रीय गृहमंत्र्यांनी यावेळी स्पष्ट केलं.

### सुप्रिया सुळेंचा पाठिंबा

मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याच्या निर्णयाला

▶▶ उर्वरित पान २ वर

## मंगेशकर रुग्णालयाचा बेजबाबदारपणा?

### भाजप आमदाराच्या पीएच्या गर्भवती पत्नीचा मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील दिनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या प्रशासनाच्या मुजोरपणामुळं एका गर्भवती महिलेला जीव गमवावा लागला आहे. विशेष म्हणजे वेळेत उपचारांअभावी मृत्यू झालेली महिला ही भाजप आमदाराच्या पीएची पत्नी होती.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचार सुरु करण्यासाठी फोन येऊन देखील रुग्णालयानं प्रवेश नाकारल्यानं मोठा संताप व्यक्त केला जात आहे. नेमकं काय घडलं? भाजप आमदार अमित गोरखे यांचे स्वीय सहाय्यक सुशांत




भिसे यांच्या गर्भवती पत्नीबाबत हा प्रकार घडला आहे. प्रसूतीचा त्रास होत असल्यानं मोनाली ऊर्फ तनिषा सुशांत भिसे यांना पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात करण्यात आलं होतं. मात्र, उपचारांसाठी हॉस्पिटल प्रशासनानं त्यांना १० लाख रुपये खर्च सांगितला. सुरुवातीला ३ लाख

▶▶ उर्वरित पान २ वर

## स्थानिक स्वराज्य संस्थांनच्या निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी पूर्ण ताकदीने कामाला लागा: बाप्पूसाहेब मोरे

### शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडल्या होत्या. विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांनो पूर्ण ताकदीने कामाला लागा. शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म जास्त संख्येने भरून शिवसेना पक्ष संघटन



मजबूत करा असे शिवसेना बीड जिल्हा संपर्क प्रमुख बाप्पुसाहेब मोरे यांनी शिवसेना बीड जिल्हा आढावा बैठक तथा सदस्य नोंदणी अभियानाचा शुभारंभा प्रसंगी आपले मत व्यक्त केले. शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री ना. एकनाथजीशिंदे साहेब तथा खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार तसेच शिवसेना सचिव संजय मोरे साहेब, शिवसेना उपनेते व मराठवाडा संपर्कप्रमुख अर्जुनभाऊ खोतकर साहेब

▶▶ उर्वरित पान २ वर

### देशमुखांच्या कुटुंबीयांसाठी औसेकरांचा मदतीचा हात

## मतदारसंघात जमा झालेले 21 लाख सुपूर्द



**औसा । प्रतिनिधी**

मस्साजोग (ता. केज) येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना मदत करण्यासाठी औसा मतदारसंघातील नागरिक सरसावले. नागरिकांच्या मदतीतून २१ लाखांचा निधी जमा झाला. आमदार अभिमन्यू पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी बुधवारी (ता. दोन) मस्साजोगता भेट देत हा निधी देशमुख कुटुंबाकडे सुपूर्द केला. सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर महाराष्ट्र हळहळला. या घटनेला जबाबदार असणाऱ्यांना कडक शिक्षा झाली पाहिजे, असे म्हणत आमदार अभिमन्यू पवार यांनी बीड येथे झालेल्या सभेत हजेरी लावली होती. सरकारकडे देशमुख कुटुंबासाठी न्याय तर मागूच, पण संकटात सापडलेल्या या कुटुंबाला आर्थिक आधार देऊ, असा निर्धार त्यांनी त्यावेळी केला होता. त्यानंतर त्यांनी मतदारसंघातील दानशूरांना सढळ हस्ते मदतीचे आवाहन केले होते. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला. तब्बल एकवीस लाख रुपये जमा झाले. आमदार पवारांनी आपल्या सकाऱ्यांसह बुधवारी मस्साजोग येथे जाऊन संतोष देशमुखांच्या कुटुंबाकडे ही मदत सुपूर्द केली.

गेलेला माणूस आपण परत आणू शकत नाहीं; पण किमान त्यांच्या कुटुंबीयांना मायेचा आधार द्यावा, अशी माझ्यासह अनेक

▶▶ उर्वरित पान २ वर

## व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेस 7 कोटी 75 लाखाचा नफा : अध्यक्ष डॉ. आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**

येथील व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेची गतवर्षी रिझर्व बँकेच्या निर्बंधातून मुक्तता झाल्यानंतर ३१ मार्च २०२५ अखेर बँकेची आर्थिक परिस्थिती उत्तम झाली आहे. बँक पूर्ववैभवाकडे वेगाने वाटचाल करत आहे. बँकेला चालू वर्षात ७ कोटी ७५ लाख रूपयांचा नफा झाला असून रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे सी.आर. ए. आर. ९ टक्के असल्यास बँक उत्तम असल्याचे मानते तो बँकेकडे आज ६४.४२ टक्के सी.आर.ए.आर. आहे. बँकेचे नेटवर्थ हे सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढले असून मार्च २०२५ अखेर बँकेचे नेटवर्थ २५ कोटी ७ लाख रूपये झाले असून बँक पूर्वपदावर येत असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा यांनी दिली. व्दारकादास मंत्री नागरी सहकारी



बँकेच्या सभासद बैठकीत अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, बँकेची चौफेर प्रगती होत आहे. आवश्यक त्या तरतुदी बँकेने केल्या आहेत. बँकेकडे आज ६३ कोटी ६३ लाख इतक्या ठेवी आहेत. बँकेने दिलेले कर्ज हे रु.७९ कोटी ८२ लाख आहे. तर बँकेकडे राखीव व इतर निधी ४८ कोटी ९८ लाख रूपये इतका आहे. बुडीत संशयित निधीमध्ये ५३ कोटी ५५ लाख रूपये आहे आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

## भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान'वर विविध विकास कामाचे भूमिपूजन

### लोकनेते मुंडे साहेबांचा आदर्श आणि संत भगवान बाबांच्या शिकवणुकीचा अंगीकार करा: ना.पंकजा मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथ मुंडे साहेबांनी समाजाला स्वाभिमान दिला. समाजाच्या विकासासाठी अहोरात्र कष्ट घेतले. त्यांच्या घराचा वासाने वारसा घेऊन आपण पुढे जाऊया. सर्व स्तरातील समाज बांधवांनी आणि सर्व तरुण कार्यकर्त्यांनी स्वाभिमान ठेवून जीवन जगावे. जीवन पुढे घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे व कष्टाने कार्य करावे. संतश्रेष्ठ भगवानबाबा यांनी 'एकर विका, आणि शाळा शिका' असा मूलमंत्र देऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. आज समाजात उच्च विद्या विभूषित मंडळी असून विविध क्षेत्रात गुणवंत आणि कर्तबगार




विद्यार्थी घडत आहे. मुंडे साहेबांच्या कार्याचा वसा आणि वारसा घेऊन आणि संतश्रेष्ठ भगवानबाबांचा शिकवणीचा अंगीकार करून जीवन जगावे, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरणावर पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले.

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठानवर पर्यटन विकास महामंडळाच्या वतीने मंजूर बांधकामाचे भूमिपूजन शुभारंभ प्रसंगी ना. पंकजाताई मुंडे बोलत होत्या.

याप्रसंगी आपल्या भाषणात पुढे बोलताना ना.पंकजाताई मुंडे म्हणाल्या, लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे यांनी समाजाला स्वाभिमानाने जीवन जगण्याचा मूलमंत्र दिला. आपण दोन घास कमी खा, पण प्रामाणिकपणे स्वाभिमानाने जीवन जगावे. आजच्या बिघडत असलेल्या तरुण वर्गांना आणि युवकांना योग्य प्रवाहात आणण्यासाठी मान्यवरांनी ज्येष्ठ व्यक्तीने कार्य करावे. माध्यमातून विविध उपक्रमआपल्याला मिळालेले पशुसंवर्धने पर्यावरण खात्याविषयी अनेकांना माहिती नसली तरी पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून हृदय योजना करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# वाढती वाहनसंख्या : भविष्यातील संकटाची नांदी !

आपल्याही दारात आपली स्वतःची गाडी असावी असे प्रत्येक व्यावहारिक माणसाचे स्वप्न असते. हे स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी अनेकांना मुहूर्त सापडतो तो गुढीपाडवा, दसरा किंवा दिवाळीचा. या तीन सणांना गाड्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी आणि विक्री होती. यंदा गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर राज्यात ८६ हजार ८१४ वाहन खरेदीची नोंद झाल्याचे वृत्त नुकतेच वाचनात आले. वाहन खरेदीचे हे प्रमाण मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा तब्बल ३० टक्यांनी वाढले आहे. या वाहन खरेदीमध्ये अर्थातच शहरवासीय आघाडीवर आहेत. पुणे, मुंबई, नाशिक आणि ठाणे शहर पहिल्या पाचांत आहेत. शहरांत पूर्वी सर्वच गाड्या पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या असत, त्यानंतर सीएनजीचा पर्याय आला. इंधनखर्च वाचावा म्हणून लोकांनी आपल्या जुन्या गाड्या विकून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या आता विजेवर म्हणजेच बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात येऊ लागल्या आहेत त्यामुळे लोकांकडून या गाड्यांना अधिक पसंती मिळू लागली आहे. टॅक्सी रिक्षा यांच्याप्रमाणे खासगी वाहनांच्या खरेदी विक्रीवर कोणतेच बंधन नसल्याने शहरातील वाढती वाहनसंख्या डोकेदुखी ठरू लागली आहे.



मुंबईतील वाढत जाणारी वाहनांची संख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागण्याची दाट शक्यता आहे. लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबईला आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. यांवर पर्याय म्हणून सुरु केलेली मोनो आणि मेट्रो रेल्वेही कमी पडू लागल्या आहेत. आजमितीला मुंबईकरांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य मुंबईकरही स्वत:च्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे. व्यवसायासाठी घेतल्या जाणार्या रिक्शा-टॅक्सींसह, 'ओला', 'उबेर' यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी विकत घेण्यात येणार्या वाहनांचीही दरवर्षी यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणार्या वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे. मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा दर असल्याने गाड्या उभ्या करण्यासाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे. दर वर्षी मुंबईतील वाहनांच्या संख्येत दोन ते तीन लाख वाहनांची भर पडते. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल. सद्यस्थितीत राज्यभरातील एकूण वाहनांपैकी १० टक्क्यांहून अधिक वाहने इवल्याशा मुंबईच्या रस्त्यांवरून फिरतात. मुंबईतील रस्त्यांची एकूण लांबी सुमारे १९०० किलोमीटर आहे. एकूण वाहनांची संख्या पहाता प्रति किलोमीटरमागे मुंबईत २३६८ वाहने आहेत. 'मुंबईतील सर्व वाहने एकाच दिवशी रस्त्यावर आली, तर रस्त्यावरून चालण्याकरिता जागाच शिल्लक रहाणार नाही.' असे मत वाहतूकतज्ञांनीही व्यक्त केले आहे. या आकडेवारीतूनच भविष्यात मुंबईचे काय होणार याचा अंदाज येतो. मुंबईतील वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषत: लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुफ्फुसांचे विकार जडत आहेत. मुंबईत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो. त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. यांवर पर्याय म्हणून सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांना मुंबईत प्रवेशबंदी करण्यात आली होती; मात्र त्याचाही विशेष लाभ झाला नाही. जीएसटी आल्यानंतर ऑक्ट्रॉय नाकेही बंद झाल्याने मुंबईत येणाऱ्या वाहनांची संख्या आणखी वाढली आहे. वाहनसंख्येच्या क्रमवारीत मुंबईच्या पुढे असलेल्या देहली शहरात एक दिवस सम क्रमांक असलेली आणि एक दिवस विषम क्रमांक असलेली वाहने चालवण्याचा पर्याय शोधण्यात आला होता; मात्र याचा भार सार्वजनिक वाहतूक यंत्रणेवर पडत असल्याने मुंबई शहरात हा पर्यायसुद्धा उपयोगाचा नाही. मुंबईप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, पुणे या प्रगतशील शहरांतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. वाहनसंख्येची समस्या लवकरच रौद्र रूप धारण करू शकते. यासाठी राज्य प्रशासनाने चिंतन करून वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याचे आणि या भीषण समस्येविषयी लोकजागृती करण्याचे उपाय लवकरात लवकर शोधले पाहिजेत.

**– जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**

## उष्णतेची लाट: काय करावे व काय करू नये

● उष्णतेच्या लाटेमुळे शारीरिक ताण निर्माण होऊन मृत्यू होण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या लाटेदरम्यान परिणाम कमी करण्यासाठी आणि उष्मघातामुळे होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी खालील उपाय करू शकता.

● उष्णतेच्या लाटेची माहिती देण्याकरिता रेडिओ, टि.व्ही., सोशल मिडीया व स्थानिक वृत्तपत्रे प्रसारमाध्यमांचा वापर करावा.

● जिल्हा नियंत्रण कक्ष/ महानगरपालिका नियंत्रण कक्ष/ विभागीय स्तरावरील नियंत्रण कक्ष व स्थानिक संस्था आणि आरोग्य विभाग यांनी एकत्रित कार्य करावे.

● सर्व संबंधित विभाग, स्थानिक पुढारी व सामाजिक संस्था यांनी या कार्यात सामील व्हावे.

● उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करावे

● तहान लागलेली नसली तरीही अधिकाधिक पाणी प्यावे.

● हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत.

● बाहेर जातांना गॉगल्स, छत्रो/टोपी, बुट व घपलाचा वापर करावा.

● प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी.

● उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा.

● शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, तोरणी, लिंबू पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करावा.

● अशक्तपणा, स्थूलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावित व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

● गुरांना छावणीत ठेवावे. तसेच त्यांना पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे.

● घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

● पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा. तसेच थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे.

● कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी.

● सूर्य प्रकाशाच्या थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करावे.

● पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा.

● बाहेर कामकाज करीत असताना अधून मधून विश्रांती घेऊन नियमित आराम करावा.

● गरोदर कामगार व आजारी कामगारांची अधिकची काळजी घ्यावी.

● रस्ताच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरिता शेड उभारावेत.

● जागोजागी पाणपोईची सुविधा करावी.

● उष्माघातापासून बचाव करण्यासाठी काय करू नये

● लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये.

● दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे.

● गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे.

● बाहेर तापमान अधिक असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत बाहेर काम करणे टाळावे.

● उन्हाच्या कालावधीत स्वयंपाक करण्याचे टाळावे. तसेच मोकळ्या हवेसाठी स्वयंपाकघराची दारे व खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

पान ४ वरून पुढे...

### आष्टी मतदार..

करण्याचे कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी,जलसंपदा विभागामार्फत कार्यवाही प्रगतीत आहे.सदर कामाच्या प्रस्तावास राज्य तांत्रिक सल्लागार समिती -१. नाशिक यांनी दि. ०५/०७/२०२४ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिलेली असून प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर आहे.सदर प्रस्तावास मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मंजुरी आवश्यक आहे.ब्रम्हनाथ येळंब व निमगाव(मायंबा) ता.शिरूर (का) जि. बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण करण्याचे काम या प्रस्तावास आगामी मंत्रीमंडळ बैठकीमध्ये हे पत्र मी १३/१२/२०२४ रोजीच दिले होते.यावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ह्या कामाचे कॅबिनेटमध्ये प्रस्ताव घेतल्याचे आपल्या जिल्ह्यातील कॅबिनेट मंत्रीमहोदय यांना समजताच या कामाचे श्रेय घेऊन आष्टी मतदारसंघाला आम्ही केलेले कामे दाखवून आम्हाला गिफ्ट देऊन नये असा खरपूस समाचार आ.सुरेश धस यांनी पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे.

### माजलगाव पंचायत...

जनता यांच्यातला तुम्ही तूप नावाचा पदार्थ बघत आहात आंदोलन नावाचा बडगा विसरत आहात आपला कॉन्टॅक्टं बेस वरील कर्मचारी जनतेचे लूट करतो आहे आणि ती आपण उघड्या डोळ्यांनी पाहणार असाल याला जनता जळत असताना चांगले वाद्य ऐकणारे राजा नाही तर कर्मचारीच म्हणावे लागेल त्यामुळे आपण आपल्या कर्मचाऱ्याला पाठीशी घालण्यापेक्षा प्रजेला न्याय देण्याचा निश्चितच प्रयत्न कराल एवढी अपेक्षा ठेवू त्यातील काही मलिदा तुमच्या पर्यंत पोहोचत असावा अशी आम्ही समजून जाऊ यामुळे तुम्हाला भविष्यातील आंदोलनाला सामोरे जावे लागणारच एवढे मात्र नक्की आहे माजलगाव तालुक्यातील जनता संत नाही शांत आहे त्यामुळे तुम्ही ठरवा आपला एक कर्मचारी वाचवायचा कि लाखो जनता अशी चर्चा सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे त्यामुळे आपण सुज्ञ तालुक्याच्या तारणहार कर्मचारी म्हणून निश्चितच सर्वसामान्य जनतेच्या बाजूने उभे राहाल अशी आशा वाटत आहे

पान ४ वरून पुढे...

### बीड शहर ...

आलेल्या ईद मिलन (मिलाफ) च्या कार्यक्रमास हिंदु-मुस्लीम समाज बांधवांनी उपस्थित रहावे. असे आवाहन कार्यक्रमांचे आयोजक तथा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पु कागदे, राजू जोगदंड, रमेश गंगाधरे, मझरखान, किसन तांगडे, सादेक पठाण, रफीकभाई फिटर, सुलतान बाबा, सय्यद जफर, सिद्दीक फारोखी, रणजीत शिनगारे, नुरुल खान, शेख रोहील रफिक, फरहान बागवान आदिनी केले आहे.

### "तुळजाभवानी अर्बनची ...

कर्जाची वाढती मागणी आणि ग्राहकांचा विश्वास यामुळे संस्थेला आपला व्यवसाय विस्तारण्यात यश मिळाले आहे.

भविष्यातील योजना: संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ म्हणाले, आम्ही आमच्या सभासदांचा आणि ग्राहकांचा विश्वास जपत आहोत. मार्च २०२५ अखेर १००८.६८ कोटींचा व्यवसाय हा आमच्या प्रगतीचा पुरावा आहे. भविष्यात आम्ही कर्ज वितरण वाढवण्यावर, डिजिटल बँकिंग सेवांचा विस्तार करण्यावर आणि सभासदांसाठी नवीन योजना आणण्यावर लक्ष केंद्रित करणार आहोत.संस्था पुढील काही वर्षांत खालील क्षेत्रांवर विशेष लक्ष देणार आहे:डिजिटल बँकिंग सेवांचा विस्तार, जसे की ऑनलाइन कर्ज अर्ज प्रक्रिया. सभासदांसाठी आर्थिक साक्षरता कार्यक्रम राबवणे, ज्यामुळे ठेवी आणि कर्ज मागणी वाढेल.संस्थेने आपल्या सभासद आणि ग्राहकांना आवाहन केले आहे की, सर्व ग्राहक, ठेवीदार, सभासद, ठेवीदार, कर्जदार, शुभचिंतक आणि मित्र परिवाराने कोटी कोटी धन्यवाद! आपल्या विश्वासाने, प्रगतीच्या दिशेने! संस्था आपल्या सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी आणि त्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी कटिबद्ध आहे.

पान १ वरून पुढे...

### सोलापूर हादरलं! ...

हादरतात. सोलापूरच्या आजच्या भूकंपानंतर अनेकांच्या मनात लातूरच्या १९९३च्या भीषण भूकंपाच्या आठवणी पुन्हा जाग्या झाल्या आहेत. थायलंडच्या ताज्या घटनेनंतर आता सोलापुरातही भूकंपाचे धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये चिंतेचं वातावरण आहे.

### शरद पवारांची...

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षानंही पाठिंबा दिला. या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी याबाबतची माहिती द या सोशल मीडियावर पोस्ट टाकत केली आहे. 'मणिपूर येथील परिस्थिती लक्षात घेता येथे राष्ट्रपती राजवट लागू करण्याबाबतचा प्रस्ताव लोकसभेत मांडण्यात आला. या प्रस्तावाला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने पाठिंबा दिला. मणिपूरमध्ये झालेल्या घटना या अतिशय दुर्दैवी होत्या. यामुळे तेथील समाजमन ढवळून निघाले आहे. तेथे मुक्त व निर्भय वातावरणात निवडणुका होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने तेथे लवकरात लवकर निवडणुका घ्याव्या अशी मागणीही सभागृहात केली,' अशी पोस्ट सुप्रिया सुळे यांनी केली. त्यांनी याबाबतचा व्हिडिओ देखील पोस्ट केला आहे.

शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस प्रमाणे अन्य विरोधी पक्षांनीही या विधेयकावर सरकारला पाठिंबा दिला. त्याचबरोर राज्यात लवकरात लवकर शांतता प्रस्थापित व्हावी आणि चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सोडावे अशी मागणी विरोधकांनी केली.

### मंगेशकर रुग्णालयाचा....

रुपये भरायची तयारी नातेवाईकांनी दाखवल्यानंतरही रुग्णालय प्रशासनानं ऐकलं नाही. तसंच मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दीनानाथ रुग्णालय प्रशासनाला फोनही केला. पण तरीही रुग्णालय प्रशासनानं ऐकलं नाही. त्यानंतर दुसऱ्या रुग्णालयात हलवत असताना अतिरक्तस्राव होऊन तनिषा भिसे यांचा मृत्यू झाला, असा दावा भाजप आमदार अमित गोरखे यांनी केला आहे. याप्रकरणाची तक्रारही त्यांनी मुख्यमंत्र्यांकडं केली आहे.

जुळ्या मुलांना जन्म देऊन आईचा मृत्यू- दरम्यान, तनिषा भिसे यांनी जुळ्या मुलांना जन्म दिला पण प्रसूती दरम्यान गुंतागुंत वाढल्यानं आईचा मृत्यू झाला. त्यामुळं दोन जिवांना जीवदान देत आईचा अंत झाल्यानं हळहळ व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर रुग्णालय प्रशासनावर संताप व्यक्त होत आहे. वेळेत उपचार मिळाले असते तर...... दरम्यान, मृत्यू पावलेल्या मोनाली भिसे यांची नणंद प्रियांका पाटे यांनी सांगितलं की, तनिषा भिसे माझी वहिनी लागते. २८ तारखेला रक्तस्राव होत असल्यानं

पान १ वरून पुढे...

तिला दीनानाथमध्ये नेलं होतं. त्यावेळी डॉक्टर म्हणाले की, तुम्हाला २० लाख रुपये भरावे लागतील, तुमची ऐपत नसेल तर ससून रुग्णालयात जा, असा सल्लाही देण्यात आला. याच काळात वहिनीचा बी पी वाढला आणि त्यांना खूप टेन्शन आलं. यावेळी रुग्णाला ओपीडीमध्ये शिफ्ट केलं, २ तास रुग्ण तिथेच होता. या काळात एकही डॉक्टर रुग्णाला बघायला तिथं आला नाही. उलट नंतर प्रशासनानं आम्हाला पूर्ण १० लाख रुपये भरा, त्याशिवाय पेपर करणार नाही असं सांगितलं. मीनाक्षी गोसावी या तिथल्या डॉक्टर म्हणाल्या, ५ लाख रुपये भरा तेव्हा उपचार होतील. डॉक्टर सुश्रुत घैसास यांनी स्वतः सांगितलं की, १० लाख रुपये भरा. आम्ही ३ लाख रुपये भरायता तयार होतो, या सगळ्या गोंधळात २ ते ३ तास लागले. वेळेत उपचार झाले असते तर आमची वाहिनीं वाचली असती. या प्रकाराला दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील डॉ. सुश्रुत घैसास आणि बिलिंग डिपार्टमेंटमधील मॅडम जबाबदार आहेत

रुग्णालयाचं म्हणणं काय? या घटनेबाबत पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे जनसंपर्क अधिकारी रवी पालेकर यांनी रुग्णालयाची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी सांगितलं की, या घटनेची दीनानाथ रुग्णालयाकडून चौकशी केली जाणार आहे. या चौकशीचा अहवाल आम्ही राज्य सरकारला सादर करु. मीडियात सध्या बातम्या येत आहेत त्या अर्धवट आहेत. रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या आरोपांची चौकशी केली जाणार आहे. सध्या मला जास्त बोलता येणार नाही

### स्थानिक स्वराज्य....

आणि मराठवाडा विभागीय सचिव अशोक पटवर्धन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल दि. ३ एप्रिल २०२५ रोजी दु. १२.०० वाजताच्या दरम्यान माळीवेस चौक येथील हनुमान मंदिर सभागृहात शिवसेनेच्या बीड जिल्ह्यातील महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक आयोजित संपन्न झाली. या बैठकीत मागील सदस्य नोंदणीचा आढावा घेण्यात आला. तसेच नवीन सदस्य नोंदणीचा शुभारंभ शिवसेना, महिला आघाडी, युवासेना शेतकरीसेना, ओबीसी सेना, अनुसूचित जाती-जमाती सेनेचे आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व उपस्थित शिवसैनिकांच्या शुभहस्ते करण्यात आला. आपल्या शिवसेना पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी एकनाथजी शिंदे साहेब यांची बीड जिल्ह्यातून ताकद वाढविण्यासाठी तर यंदाच्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी बीड जिल्ह्यातून सर्वाधिक शिवसेना सदस्य नोंदणी फॉर्म भरण्याची जिम्मेदारी आपल्या सर्व आजी-माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, शाखाप्रमुख व शिवसैनिकांच्या खांद्यावर

पान १ वरून पुढे...

असून आपण सर्व प्राधान्याने पुढाकार घेऊन सदस्य नोंदणीच्या अभियानात आपले सर्वोपरी योगदान द्यावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक यांनी आपल्या भाषणात केले. या बैठकीचे सूत्रसंचलन प्रतिक कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिवसेना उप जिल्हाप्रमुख संतोष जाधव यांनी केले.

### मतदारसंघात जमा...

सहकाऱ्यांची भावना होती. देशमुख कुटुंबीयांना मदत करण्याच्या आमच्या भावनेला औसा मतदारसंघातील नागरिकांचे भक्कम पाठबळ लाभले. २१ लाखांचा मदत निधी जमा झाला, तो देशमुख कुटुंबाकडे सुपूर्द केला. माणुसकीचे नाते दृढ करण्यासाठी आम्ही हा उपक्रम राबविला. - अभिमन्यू पवार, आमदार औसा

### व्दारकादास मंत्री...

बँकेचे भाग भांडवल हे २०.०१ कोटी आहे. बँकेची शासकीय रोखे व इतर बँकेतील गुंतवणूक ६३ कोटी ४७ लाख रूपये इतकी आहे. रोख व बँक शिल्लक १७ कोटी ७७ लाख रूपये आहे. अशी बँकेकडे एकूण लिक्विडिटी ८१ कोटी २५ लाख रूपये आहे. यावरून बँक किती सक्षम आहे हे आपल्याला नक्कीच लक्षात येईल असे अध्यक्ष डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा म्हणाले. पुढे बोलतांना ते म्हणाले की, द्वारकादास मंत्री बँकेची स्थापना सन १९६२ मधे झाली होती. बँकेने ३५ टक्के ते ८५ टक्के लाभांशाचे वाटप करून देशभरात नाव केले. कालांतराने बँकेची भरभराट चालू असतांना काही तांत्रिक बाबीवरून बँकेवर प्रशासकाची नियुक्ती झाली व प्रशासकाचे भीतीने बँकेच्या ठेवीदारांनी मोठ्या प्रमाणात ठेवी काढून घेतल्या प्रशासक येण्यापूर्वी बँकेकडे रु.२८१ कोटीच्या ठेवी होत्या बँकेने मागेल त्या ठेवीदारांना ठेवीची रक्कम परत केली त्यामुळे बँकेच्या ठेवी कमी झाल्या. बँकेची आर्थिक स्थिती उत्तम असतांना प्रशासकांनी दिलेल्या अहवालामुळे बँकेवर आर्थिक निर्बंध लागले होते निर्बंधाचे काळात व्यवहार बंद असल्यामुळे बँकेचे नियमित कर्जे मोठ्या प्रमाणात वसूल झाले जानेवारी २०२३ मधे बँकेवर संचालक मंडळ निवडून आले व बँकेस पुन्हा गत वैभव मिळणे साठी संचालक मंडळाने प्रयत्न चालू केले बँकेच्या भाग भांडवलामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली,थकीत कर्जाची वसुली केली व भारतीय रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे आवश्यक निकषांची बँकेने पूर्तता केली आणि २६ फेब्रुवारी २०२४ रोजी बँकेवरील लावलेले आर्थिक निर्बंध भारतीय रिझर्व बँकेने उठवले त्यामुळे बँकेचे सर्व प्रकारचे व्यवहार पूर्ववत चालू झाले. बँकेवर आलेल्या सर्व अडीअडचणींवर मात करत बँकेचे सन्माननीय सभासद, ग्राहक व हितचिंतकांचे विश्वासाने बँकेने प्रगतीकडे वाटचाल चालू केली असल्याचे ते म्हणाले. यावेळी बँकेचे

पान १ वरून पुढे...

उपाध्यक्ष शुभम चितलांगे, संचालक डॉ.अदिती सुभाषचंद्रजी सारडा, सी. ए.गिरीश गिल्डा, संतोष लहाने, अंजली पाटील, डॉ.अरुण मुंडे, सुधाकर वैष्णव, रघुनाथ चौधरी, डॉ. राहुल खडके, दिनेश देशपांडे, शेख सलीम, राम गायकवाड, सतीश धारकर, प्रल्हाद वाघ, बँकेचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन एस.एच., राधेश्याम सोनी, शाखाधिकारी धनंजय ताठे, संतोष काळे, कैलास सावंत यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कर्जाची आवश्यकता असणाऱ्यांनी बँकेकडे संपर्क साधून कर्ज घ्यावे- व्दारकादास मंत्री बँक ही भारतातील एकमेव बँक असून याची दाखल केंद्र शासनाचे सहकार मंत्रालयाने सहकारी बँकिंग क्षेत्राचे परिवर्तनासाठी शासनास सल्ला देणे साठी नियुक्त केलेल्या टास्क फोर्सने घेतली व व्दारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेने निर्बंध उठण्यासाठी केलेल्या कामाचा आढावा घेवून त्याचा आदर्श भारतातील निर्बंध लागलेल्या सहकारी बँकांना देवून त्या बँका निर्बंधमुक्त होण्यासाठी त्यांना मार्गदर्शन केले. द्वारकादास मंत्री नागरी सहकारी बँकेचे व्यवहार आता पूर्ववत सुरु झाले असून कर्ज वाटपासाठी बँकेकडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे. त्यामुळे ज्यांना स्वतःची आर्थिक घडी बसवण्यासाठी कर्जाची आवश्यकता आहे. त्यांनी बँकेकडे संपर्क साधून आवश्यक असलेले कर्ज घ्यावे.- डॉ.आदित्य सुभाषचंद्रजी सारडा, अध्यक्ष व्दारकादास मंत्री बँक

### भगवानबाबा सामाजिक...

आपण प्रयत्न करणार आहोत. पर्यावरण सुधारण्यासाठी या खात्याचा माध्यमातून प्रयत्न करण्यात येईल. तसेच भविष्यात लाडकी बहीण या उपक्रमाच्या धरतीवर 'लाडका भाऊ' ही योजना भविष्यात राबविण्यात येणार आहे. संत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी आपल्या भाषणातुन केले. प्रारंभी सर्व मान्यवरांचे स्वागत प्रतिष्ठानचे विश्वस्त डॉ. प्रभाकर धायतडक, प्राचार्य वसंत सानप, प्रा. आर.टी. गर्जे, डॉ.अमोल लहाने, डॉ. शिवाजी सानप, सुनील मिसाळ, गणेश पुजारी, आदींनी केले. कार्यक्रमास डॉ.योगेश क्षीरसागर, भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माजी सभापती संतोष हंगे, महामंडलेश्वर १००८ शिवरुद्रानंद महाराज, ह.भ.प. वसंत महाराज आंधळे, कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे, आदित्य सारडा, नवनाथ अण्णा शिराळे, सर्जेराव तांदळे, सलीम जहागीर, प्रा पी.टी. चव्हाण, शिवाजी मुंडे, मोहन महाराज खरमाटे, बाबुराव मुंडे, आदीसह भगवानबाबा भक्त व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुभाष धस यांनी तर संचलन नागरे नाना यांनी केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

## जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचा-यांविरूध्द प्राप्त होणा-या तक्रारीबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड यांचे अध्यक्षतेखाली दि. ०७ एप्रिल २०२५ रोजी स. १०.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे. याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून पुराव्यासह लेखी स्वरूपात मांडाव्यात. सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी समितीमध्ये घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जि. भ्र. नि.स. तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

## जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षण घेण्यास सहभागी होणे बाबत आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात विविध खेळांचा प्रचार व प्रसार होऊन जिल्ह्यातील खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी व्हावेत हा उद्देश ठेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे राज्य शासनामार्फत नियुक्त तज्ञ क्रीडा मार्गदर्शक यांचे मार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड, जिल्हा क्रीडा संकुल, बीड, येथे सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळाचे प्रशिक्षण केंद्र नियमीत सुरू आहे. जिल्हा परिषद कन्या प्रशाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे (सकाळी ०७.०० ते ९.०० वाजेपर्यंत आणि जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे दुपारी ०४.३० ते ०७.०० वाजेपर्यंत सॉफ्टबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, बेसबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार व मैदानी खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील हे प्रशिक्षण देत आहेत. बीड शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सदर प्रशिक्षण केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे. अधिकच्या माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३), क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) व क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील (मो. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांचे वतीने कळविण्यात येत आहे.

## ग्रेस गुण अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने भरण्यास दिनांक ०८ एप्रिल पर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयातील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापक यांना कळविण्यात येते की, प्रतिवर्षीप्रमाणे इयत्ता १० वी व १२ वी च्या खेळाडू विद्यार्थ्यांचे ऑफलाईन अर्ज मागविले जातात. त्या माहितीचे संकलन करुन कार्यालयाद्वारे सदरचे अर्ज माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत मंडळास ग्रेस गुण मिळणे करीता पाठविले जातात. सन २०२३-२४ पर्यतची ग्रेस गुण प्रक्रीया काही मानवी उणीवांमुळे हे काम अचुक व दोषरहीत होणे क्लिष्ट होत होती. व त्याचा फटका विद्यार्थ्यांना त्यांच्या गुण न मिळण्याने बसत होता. या प्रश्नावर तोडगा आणि सदर सवलत गुण प्रक्रीया निर्दोष करण्यासाठी या वर्षीपासुन म्हणजेच २०२४-२५ पासुन ग्रेस गुणांसाठी केली जाणारी प्रक्रीया शासनाच्या आपले सरकार पोर्टलद्वारे ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच सदर पोर्टलद्वारे सर्व अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्याकडे सादर करण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. खेळाडू विद्यार्थी / जिल्हयातील सर्व माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांनी आपले सरकार अ पद्वारे या वर्षीपासुन सवलत गुणांचा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासंदर्भात कोणताही खेळाडू जिल्हा क्रीडा कार्यालयास ऑफलाईन पध्दतीने अर्ज करणार नाही व अशा प्रकारचा अर्ज जिल्हा क्रीडा कार्यालयाकडुन स्विकारला जाणार नाही जर अशी बाब कार्यालयाच्या निदर्शनास आली तर त्यासंदर्भात होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक नुकसानीस संबंधित संस्था जबाबदार राहतील. इ. १० वी व इ. १२ वी विद्यार्थाचे ग्रेस गुण अर्ज शासनाच्या आपले सरकार पोर्टलवर ऑनलाईन अर्ज सादर करण्या करिता दि. ३१ मार्च २०२५ ही तारीख जाहिर करण्यात आली होती.

## सहकारी संस्थांसाठी चौकशी अधिकारी पॅनल तयार करण्यासाठी अर्ज मागविले

**बीड । प्रतिनिधी**

विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर यांच्याकडून कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८३ व ८८ अंतर्गत चौकशी अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची पुरवणी नामतालिका (पॅनल) तयार करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. यासाठी सहकार खात्यातून निवृत्त अधिकारी (७० वर्षे वय पूर्ण न झालेल्या),निवृत्त न्यायाधीश,वकील आणि चार्टर्ड अकाउंटंट पात्र असतील.अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, लातूर विभाग तसेच लातूर, बीड,नांदेड आणि संबंधित जिल्ह्यांतील सर्व उपनिबंधक व सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयांमध्ये १ एप्रिल २०२५ ते ३० मे २०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहतील. इच्छुक उमेदवारांनी भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह संबंधित कार्यालयात विहित कालावधीत सादर करावेत. असे सहकारी संस्थेचे विभागीय सहनिबंधक, सुनिल शिरापूरकर यांनी कळविले आहे.

# आ.संदीप क्षीरसागरांच्या दूरदर्शी प्रयत्नाला यश

### बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचा आ.क्षीरसागरांनी केला शुभारंभ ; बंधारा कम पुलामुळे बीड शहरासह परिसरातील गावांची भूजल पातळी वाढणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने यासंदर्भात पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधार्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची बाब आहे.

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर



यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

### • पूल कम बंधार्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

**शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधार्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.**

# बीड जिल्हा व्यापारी महासंघ व सद्भावना ग्रुप कडून डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याचे भूमिपुत्र व गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ. ओमप्रकाश शेटे यांची नुकतीच आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्ष पदी निवड झाली. डॉ.शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वाची जबाबदारी आल्यामुळे निश्चितच जनतेला त्याचा फायदा होणार



आहे. या अनुषंगाने बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष तथा सद्भावना मित्र परिवार चे सदस्य अशोक शेटे व सद्भावना ग्रुप चे अध्यक्ष रत्नाकर क्षीरसागर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे कार्याध्यक्ष अशोक शेटे सद्भावना ग्रुप चे अध्यक्ष रत्नाकर क्षीरसागर, वाय जनार्दन राव , राजेंद्र मुनोत,सूरज लाहोटी, पूसारामजी लद्दड, विकास उमापूरकर, गोपाल कासट,कल्याण कुलकर्णी, अमर डागा,विश्वनाथ माणूसमारे,प्रीतम खिंवसरा तसेच इतर व्यापारी उपस्थित होते.

# कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्याच्या मागणीसाठी नागरिक आक्रमक

### वेळेत मागणी पूर्ण न झाल्यास परळी - अंबाजोगाई महामार्गावर रस्ता रोको करणार - राजेभाऊ फड

**परळी वै. । प्रतिनिधी**

उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून सूर्य आग ओकत आहे. यामुळे वातावरणातील तापमानात प्रचंड मोठ्या प्रमाणावर वाढ झाली असून जनावरांसाठी पाण्याची मोठी समस्या निर्माण होऊ लागलेली आहे. त्याचप्रमाणे काही भागातील जलस्त्रोत पातळीही खालावली असल्याने पाण्याचे दुर्भिक्ष निर्माण होत आहे. ही बाब लक्षात घेऊन कन्हेरवाडी लघु सिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. यापूर्वीही प्रशासनाला मागणी करण्यात आली असून त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. यामुळे नागरिक संतप्त झाले असून दिनांक १० एप्रिल पर्यंत नदीपात्रात पाणी सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे गावातील सर्व ग्रामस्थ रस्ता रोको आंदोलन करतील असा तीव्र इशारा देण्यात आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी



बीडचे जिल्हाधिकारी, गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता, जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी तथा परळी ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना पत्र लिहिले असून त्याद्वारे आंदोलनाचा तीव्र इशारा देण्यात आला आहे. १० एप्रिल पर्यंत कान्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडले नाही तर ११ एप्रिल रोजी कन्हेरवाडी येथे परळी - अंबाजोगाई महामार्गावर ग्रामस्थांसह तीव्र स्वरूपाचे रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. सद्य स्थितीत निर्माण झालेली पाण्याची कमतरता आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता कन्हेरवाडी लघुसिंचन प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात सोडण्यात यावे.

# सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालया मध्ये कृषि निविष्ठा विक्रेत्यांसाठीचा पदविका अभ्यासक्रमाचे उद्घाटन संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सौ.के.एस.के. (काकू) कृषि महाविद्यालया मध्ये कृषि निविष्ठा विक्रेत्यांसाठीचा पदविका अभ्यासक्रमाचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले. मॅनेज हैद्राबाद, वनामती नागपूर, आत्मा बीड यांच्या संयुक्त विद्यमाने कृषि निविष्टा विक्रेते यांच्यासाठी असलेला कृषि निविष्ठा पदविका अभ्यासक्रम २०१९ पासून प्रशिक्षण केंद्र म्हणुन सौ. के. एस. के. (काकू) कृषि महाविद्यालय बीड येथे राबविण्यात येत आहे. यापूर्वी सदरील



अभ्यासक्रमाच्या ४ तुकड्या पूर्ण झाल्या असून नवीन मंजूर तुकडीचा उद्घाटन समारंभ कार्यक्रम कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणुन कृषि विभाग बीडचे प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री. एस. एस. पाटील हे उपस्थित होते. तसेच अध्यक्ष स्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. जी. व्ही. साळुंके हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. प्रकल्प उपसंचालक आत्मा श्री. एस. एस. पाटील बोलताना म्हणाले की कृषि महाविद्यालया द्वारे अनेक उपक्रम राबविले जात असून या सर्व कृषि विषयक उपक्रमाना शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्यासाठी कृषि निविष्ठा विक्रेते ही मोलाची भूमिका बजावू शकतात, तसेच हे महाविद्यालय कृषि निविष्ठा विक्रेत्यांसाठी पदविका अभ्यासक्रम सुरू करणारे बीड जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय आहे, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी निविष्ठा विक्रेता यांनी सुद्धा प्रयत्न करणे तितकेच गरजेचे आहे असे सांगितले.

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ

**लिबागणेश: । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच



पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.


## जाहीर प्रगटन

**मा.श्री.के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : १०३/२०२५**

अर्जदार- सारीका पि. रामराव बांगर, वय ४१ वर्षे, धंदा घरकाम रा. भायाळा, ता.पाटोदा,जि. बीड.

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

**अर्जदारातर्फे वकिल - ॲड. एस. बी. खाडे**

मागणी - अज्ञानाचे नावे असलेली जमीन विक्री करणेची परवानगी मिळणेबाबत..

ज्याअर्थी अर्जदार **सारीका पि. रामराव बांगर**, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भायाळा, ता. पाटोदा, जि.बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान मुलगा यशराज पि. रामराव बांगर याची आई असून त्यांनी अज्ञानाचे नावे मौजे भायाळा, ता. पाटोदा, जि. बीड येथील गट नं. ५३६ मध्ये १ हे १२ आर जमीन व मौजे बेनसुर, ता. पाटोदा, जि. बीड येथील गट नं. ६१२ मध्ये ० हे १० आर जमीन अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०२/०४/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. **प्रकरणातील पुढील तारीख : ०२/०५/२०२५.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

शिक्का

## जाहीर प्रगटन

**श्रीमती. ए. टी. जगताप ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, केज, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज १६३/२०२५, अश्विनी विरुध्द निरंक**

ज्यापेक्षा **अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड,** हया दिनांक ०८/०१/२०२५ रोजी, किंवा त्या सुमारास पोलिस मुख्यालय, बीड ता.जि.बीड येथे मयत झालेल असून अर्जदार रा.कळमअंबा ता. केज जि. बीड यांनी हया कोर्टात सदरहू मयत अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड, यांचे

अर्जदार :- १. अश्विनी भ्र. अनंत इंगळे, वय-२९ वर्षे, धंदा - घरकाम रा. कळमअंबा ता. केज जि.बीड ह.मु.पोलिस मुख्यालया शेजारी, संभाजीनगर, बालेपीर, नगर रोड, बीड ता.जि.बीड, २. वेदिका पि. अनंत इंगळे, वय-०६ वर्षे, धंदा-शिक्षण अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क.१ रा. सदर, ३. सई पि. अनंत इंगळे, वय-२.५वर्षे, अज्ञान अ.पा.क. आई अर्जदार क. १ रा. सदर, ४. मुद्रीका भ्र. मारुती इंगळे, वय-८० वर्षे, धंदा-घरकाम रा.कळमअंबा ता. केज जि.बीड

यांनी शासकीय/निमशासकीय कामासाठी वारसाचे सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज विधिज्ञ सी.एस. बचुटे यांच्यामार्फत केला आहे. त्यापेक्षा अर्जदाराशिवाय सदर सदरहु अर्जदार मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क साबित दिसल्यास त्याला सदरहू मयत **अनंत पि. मारुती इंगळे रा. कळमअंबा ता. केज जि. बीड,** चे वारसाचे सर्टिफिकेट देईल. आज दि.०२/०४/२०२५ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील दि.०६/०५/२०२५

**(मार्फत- ॲड. वाय.आर. शेळके )**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

शिक्का

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, केज**

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश-४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. :५१/२०२५**

अर्जदार- सोनाली भ्र. जगन्नाथ राउत, वय ४० वर्षे, धंदा घरकाम व शेती रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड विरूद्ध

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय, ता. जि. बीड

**अर्जदारातर्फे वकिल - अँड. के. व्ही. दाभाडे, बीड.**

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार सोनाली भ्र. जगन्नाथ राउत, वयः ४० वर्षे, धंदा : घरकाम व शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराची अज्ञान **सोहम पि. जगन्नाथ राउत** याची आई असुन अज्ञानाचे पालनकर्ता आहे. अज्ञानांचे नावे मौजे उमापुर, ता. गेवराई, जि. बीड चे हाददीतील गट नं. ९१२ मधील ० हे. ९९ आर पोट खराब ०१ आर जमीन अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय, बीड**

शिक्का

CMYK

दैनिक
• epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.०४ एप्रील २०२५ पान ४

## लिंबारूईमध्ये मनरेगाची कामे बोगस ; शासनाचे लाखो रूपये वायाला गेले

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह राज्यात मनरेगाची योजना राबविली जाते. यामध्ये अनेक ठिकाणी बोगस कामे होत आहेत. रूई शहाजानपुर या ठिकाणी फळबाग, गाई गोठा, पाणंद रस्ते यासह इतर कामे बोगस झालेले आहेत. याकामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी विकास ओव्हाळ यांनी केली आहे. बीड तालुक्यातील रूई शहजानपूर येथे रोहियो अंतर्गत फळबाग, गाईगोठा, पाणंद रस्ते, सिमेंट रस्ते इत्यादी कामे कागदावर दाखविण्यात आली. याकामाचे बोगस मस्टर काढण्यात आले. तसेच कुशल बिल देखिल काढले गेले. या सर्व कामामध्ये मोठ्या प्रमाणात भष्टाचार झालेला आहे. या प्रकरणाची चौकशी करून दोषी विरोधात कारवाई करावी अशी मागणी विकास ओव्हाळ यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

# आष्टी मतदार संघाला कोणाचेही फुकटचे गिफ्ट नको, विकास कामासाठी आम्ही सक्षम : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



मतदार संघातील शिरूर कासार तालुक्यातील ब्रह्मनाथ येळंब आणि निमगाव मायंबा येथील कोल्हापूर बंधारे यांचे रूपांतरण मध्ये करण्याचा निर्णय कॅबिनेट पर्यंत आणण्याचे काम आम्ही केले आहे या कामासाठी मी २०१४ पासून प्रयत्न करत असून त्यानंतर २०२२, २०२३,२०२४, या कालावधीमध्ये देखील पाठपुरावा केल्यामुळे हा विषय कॅबिनेट मध्ये आला आणि कॅबिनेट मंत्री असल्यामुळे नामदार पंकजाताईंनी हा विषय पाहिला आणि वर्तमानपत्रात आष्टी मतदार संघाला गिफ्ट अशी बातमी छापून आणली केवळ श्रेय घेण्यात साठीच पंकजाताई मुंडे यांनी या गिफ्ट बाबत घोषणा केली आहे वास्तविक पाहता आष्टी मतदारसंघाला कोणत्याही फुकटच्या गिफ्टची आवश्यकता वाटत नाही आम्ही मतदारसंघाच्या विकास कामासाठी सक्षम आहोत या दोन बॅरेजच्या कामाबरोबरच आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये आणखीही काही बॅरेजेस मंजूर होणार आहेत त्यासाठी देखील आम्ही प्रयत्न करत आहोत दोन बॅरेज सारख्या कामाचे श्रेय घेणे योग्य नाही अशी परखड प्रतिक्रिया आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली आष्टी येथील विशेष पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

आमदार सुरेश धस पुढे म्हणाले कॅबिनेट मीटिंगमध्ये आलेला प्रस्ताव पाहून तुम्ही याचा फायदा घेतलेला आहे या बॅरेजेस च्या रूपांतरणाची श्रेय आमच्या पाठपुराव्यालाच आहे याची माहिती मतदारसंघातील जनतेला आहे या कामासाठी मी सन-२०१४ पासून प्रयत्न करत असून,यासाठी पहिल्या पासुन पाठपुरावा मी स्वतःकेला आहे. याबाबत दिलेल्या पत्रांचे पुरावे माझ्याकडे आहेत पुरावेही माझ्याकडे आहेत. वास्तविक पाहता पंकजाताई यांनी गिफ्ट द्यायचे होते तर आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यामधील मोठ्या प्रमाणावर असलेल्या पशुधन आणि दूध उत्पादन मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे पशुवैद्यकीय पशुसंवर्धन महाविद्यालय यांचे गिफ्ट आष्टी मतदार संघाला देणे योग्य होते परंतु आपण त्या विभागाच्या मंत्री झाल्यामुळे आपण ही महाविद्यालय परळी मतदारसंघात घेऊन गेलात परंतु परळी मध्ये किती दूध उत्पादन आहे आणि किती पशुधन आहे याची तुलना करावी आष्टी मतदार संघाला कोणतेही फुकटचे गिफ्ट नको.पंकजाताई यांनी कुठलाही पाठ पुरावा न करता केलेल्या कामांचे गिफ्ट आमच्या मतदारसंघाला देऊ नये.असा खरपुस समाचार आमदार सुरेश धस यांनी ना.पंकजा मुंडे यांचा नाव न घेता घेतला आहे.

पुढे बोलतांना ते म्हणाले,माझ्या मतदार संघातील शिरूर (कासार) तालुक्यातील ब्रम्हनाथ येळंव व निमगाव ता.शिरूर (का) जि.बीड या को.प.बंधा-यांचे बॅरेज मध्ये रुपांतरण

▶▶ उर्वरित पान २ वर

## दत्तात्रेय रासवे यांचे दु:खद निधन



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील खरात आडगाव येथील रहिवासी असलेले दत्तात्रेय रासवे (वय ७० वर्ष) यांचे वृद्धापकाळाने दि. ३ गुरुवार रोजी निधन झाले. अतिशय धार्मिक वृत्तीचे असलेले दत्तात्रेय रासवे मनमिळावु स्वभावाचे असल्याने सर्व परिचित होत्या. त्यांना तीन मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे रमेश रासवे यांचे वडिल होते.

# माजलगाव पंचायत समितीमध्ये माहिति अधिकाराला गौण स्थान

**माहिती मागणारा ला ज्योत्स्ना मॅडम म्हणतात ऑनलाइन घ्या ; मॅडम असं वागणं बरं नव्हं**

**माजलगाव । प्रतिनिधी**

अण्णा हजारेंनी उपोषण करून प्रशासनाच्या कारभारात हस्तक्षेप करण्यासाठी माहिती अधिकाराचा शास्त्र उपलब्ध करून दिले जो माहिती देणार नाही त्याला दंड आकारण्याचा कायदा ही झाला मात्र अशा माहिती अधिकाराला आणि कायद्याला ज्योत्स्ना मॅडम भीक घालणार नाही का? तुम्ही माहिती मागताय ऑनलाइन वरून अपलोड करून घ्या असे ज्योत्सना मॅडमचे उत्तर आहे मॅडम हे वागणं बरं नव्हं अशी चर्चा माजलगाव तालुक्यातील चिंतेत व्यक्त होत आहे माजलगाव पंचायत समिति मध्ये अनेक गोरगरीब जनतेने घरकुलासाठी ऑनलाइन फॉर्म भरले आहेत अनेकांची घरकुल मंजूर झाली आहेत अनेकांची एक दोन हप्ते मिळाले आहेत मात्र यामध्ये सिर्नॅरिटी डावलली जाते का, वशिल्यावर घरकुल मंजूर होते का, आणि खरोखर घरकुल बांधणाऱ्यालाच हप्ते वितरित होतात का? हे पाहण्यासाठी माजलगाव चे पत्रकार संतोष रासवे यांनी माहिती अधिकार दिला मात्र ज्योत्स्ना मॅडम यांनी तुम्ही तुम्हाला हवी असलेली माहिती ऑनलाइन असून सदर माहिती अपलोड करून घ्या अशी माहिती अधिकारावर उत्तर दिल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे ज्योत्सना मॅडम आपण एका तालुक्यातील जनतेच्या तारणहार आहात आपल्याकडून पत्रकार किंवा सर्वसामान्य माणसाला हे उत्तर अपेक्षित नाहीत ऑनलाइन माहिती कुठेच पुरावा म्हणून ग्रह्य धरली जात नाही त्यावर आपल्या कार्यालयाचा सही शिक्का आवश्यक असतो एवढ्या तर तुम्ही ज्ञानी आहातच तरीपण माहिती अधिकारात आपण असे कसे उत्तर देऊ शकता त्यामुळे पत्रकार असेल किंवा सामान्य

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: गुगळादेवी शेतकरी गटाचे अध्यक्ष रामप्रसाद अशोक डोईफोडे व समृद्धी गटाचे अध्यक्ष मंगल रामप्रसाद डोईफोडे या दोन्ही गटाचा पाणी फाउंडेशन फार्मर कप २०२४ या योजनेमध्ये बीड तालुक्यामध्ये प्रथम आणि द्वितीय बक्षीस प्राप्त झाल्याबद्दल मराठवाडा पत्राचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांनी त्यांच्या निवासस्थानी डोईफोडे यांचा सहपत्नी सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.*



*लिंबगणेश: गगनभरारी महिला गट खंडाळा यांची पाणी फांडेशनच्या फार्मर कप स्पर्धेत तालुका स्तरीय दुतीय क्रमांक आल्यामुळे त्याचा सत्कार श्री श्रीकांत कुलकर्णी संतोष तेलप श्री विठ्ठल घरत व तेलप श्रीमंत यांनी विठ्ठल रुक्मिणी प्रतिमा भेट देऊन सर्व गटातील सदस्यचे अभिनंदन केले.*

## परशुराम संस्कार सेवा संघाच्यावतीने ऋचा कुलकर्णी यांचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातून न्यायाधीश परीक्षेत सर्व प्रथम आलेल्या बीड जिल्ह्याची शान कु.ऋचा विठ्ठलराव कुलकर्णी हीचा सत्कार सामुदायिक उपनयन संस्कार सोहळ्याचे निमित्त साधून महंत अमृत महाराज जोशी,परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले,ॲड कालिदास नाना थिगळे,संस्थापक अध्यक्ष गजानन जोशी,प्रदेश अध्यक्ष बाळासाहेब थिगळे,मंगल ताई आगवांन यांनी पुष्पहार आणि सन्मान चिन्ह देऊन करण्यात आला तसेच तिला भावी आयुष्यासाठी शुभेच्छा देण्यात




आल्या.कार्यक्रमास परशुराम संस्कार सेवा संघाचे प्रदेश सचिव संजय कुलकर्णी, संपर्क प्रमुख बाबा पाठक, अमृताताई जोशी सुषमाताई थिगळे अर्चनाताई जोशी.विनोद रामदासी मराठवाडा अध्यक्ष विनायक देशमुख, जिल्हाध्यक्ष मुकुंद खडकीकर, आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

## बीड शहर रिपाइंच्या वतीने रविवारी ईद मिलापचे आयोजन: उपस्थित राहण्याचे पप्पू कागदेंचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतीक असलेल्या

प्रवित्र रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक एकोपा जोपासण्यासाठी आणि हिंदू-मुस्लीम भाईचारा वाढविण्यासाठी बीड शहर रिपाइंच्या वतीने युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी दि.६ एप्रिल रविवार रोजी सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत बशीर गंज चौक बीड येथे ईद मिलन (मिलाफ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. रमजान ईदचे औचित्य साधून सामाजिक



एकोपा जोपासण्यासाठी दि. ६ एप्रिल २०२५ रोजी बीड शहर रिपाइंच्या वतीने बशीरगंज बीउ येथे आयोजित करण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर

# "तुळजाभवानी अर्बनची आर्थिक भरारी: व्यवसाय 1008.68 कोटींवर, नफा 18.30 कोटी!"

**माजलगाव । प्रतिनिधी**

तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., माजलगाव यांनी मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात अत्यंत संतोषजनक आर्थिक प्रगती साधली आहे. संस्थेने एकूण व्यवसायात १००८.६८ कोटी रुपये हा महत्त्वाचा टप्पा गाठला असून, यामुळे संस्थेच्या भक्कम आर्थिक व्यवस्थापनाची आणि ग्राहक विश्वासाची साक्ष मिळते. या आर्थिक वर्षात संस्थेने ठेवी, कर्ज वितरण, गुंतवणूक आणि नफा यामध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

आर्थिक कामगिरीचा आढावा: तुळजाभवानी अर्बनने मार्च २०२५ अखेरच्या आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे प्रमुख आर्थिक निर्देशांकांमध्ये यश मिळवले आहे:

एकूण व्यवसाय: १००८.६८ कोटी रुपये- संस्थेने १००० कोटींहून अधिक



व्यवसायाचा टप्पा गाठला आहे, जो को-ऑपरेटिव्ह क्षेत्रातील संस्थेसाठी एक उल्लेखनीय यश आहे. यात ठेवी आणि कर्ज वितरणाचा समावेश आहे, ज्यामुळे संस्थेचा विस्तार आणि ग्राहक आधाराची मजबुती दिसून येते.

ठेवी: ६०१.१२ कोटी रुपये

ग्राहकांचा संस्थेवर असलेला विश्वास ठेवींच्या वाढीतून दिसून येतो. ६०१.१२ कोटींच्या ठेवी संस्थेला कर्ज वितरण आणि गुंतवणुकीसाठी भक्कम भांडवल उपलब्ध करून देतात.

स्वनिधी: ७१.६१ कोटी रुपये- संस्थेचा स्वनिधी ७१.६१ कोटी रुपये असून, हा आकडा संस्थेच्या आर्थिक स्थिरतेचे आणि भविष्यातील विस्तारासाठीच्या सक्षमतेचे द्योतक आहे.

कर्ज वितरण: ४०७.५६ कोटी रुपये

संस्थेने ४०७.५६ कोटींचे कर्ज वितरित केले आहे, हे प्रमाण कर्ज वितरण आणि जोखीम व्यवस्थापन यांचा समतोल राखण्यात संस्थेच्या यशाचे द्योतक आहे.

गुंतवणूक: २४०.४६ कोटी रुपये

संस्थेने २४०.४६ कोटींची गुंतवणूक केली आहे, जी ठेवींपैकी ४०% आहे. या गुंतवणुकीमुळे संस्थेला स्थिर उत्पन्न मिळते आणि आर्थिक जोखीम कमी होते.

नफा: १८.३० कोटी रुपये- १८.३० कोटींचा निव्वळ नफा हा संस्थेच्या कार्यक्षमतेचा आणि चांगल्या आर्थिक व्यवस्थापनाचा पुरावा आहे. हा नफा स्वनिधी वाढवण्यासाठी आणि सभासदांना लाभांश देण्यासाठी वापरला जात असतो.

सोनतारण व ठेवीतून कर्ज: १३३.३३ कोटी रुपये- सोनतारण (गोल्ड लोन) आणि ठेवींवर आधारित कर्जाची मागणी वाढत असून, संस्थेने या क्षेत्रात १३३.३३ कोटींचे कर्ज वितरित केले आहे. यामुळे ग्राहकांच्या विविध गरजा पूर्ण होत आहेत.

तुळजाभवानी अर्बनने आपल्या आर्थिक प्रगतीसाठी ग्राहककेंद्रित दृष्टिकोन, पारदर्शक व्यवस्थापन आणि जोखीम व्यवस्थापनावर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. ठेवी आणि कर्ज वितरण यांचा समतोल राखताना संस्थेने गुंतवणुकीतून स्थिर उत्पन्न मिळवले आहे तसेच यामुळे तरलता प्रमाण राखण्यास मदत होते. विशेषतः, सोनतारण ▶▶ उर्वरित पान २ वर



*बेसिक कोचिंग क्लासेस मध्ये बक्षीस वितरण सोहळा संपन्न स्वराज्य नगर येथील वायभट सर यांच्या बेसिक कोचिंग क्लासेस मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांना बक्षीस वितरण करण्यात आले.*




## बीडमध्ये शनिवारी 'पद्माक्षी'द्वारे ग्राहकांसाठी उभी राहणार विविध स्टॉल

**बीड । प्रतिनिधी**

मागील दोन वर्षापासून बीड शहर व आसपासच्या तालुक्यातील सर्वसामान्य ग्राहकांना सर्व काही एकाच ठिकाणी खरेदी करण्याची सुवर्णसंधी पद्माक्षी व्यावसायिक प्रदर्शनाद्वारे मिळत असून येत्या शनिवारी दि.५ एप्रिल २०२५ रोजी ग्राहकांसाठी विविध स्टॉल बालाजी मंदिर, मोंढा रोड येथे उभी राहणार असून याचा लाभ घ्यावा असे आवाहन पद्मा हेमंत बियाणी व मीनाक्षी अमित सिकची यांच्याद्वारे करण्यात आले आहे.

सदरील स्टॉलच्या माध्यमातून साडी, ड्रेसेस, कुर्ता, कपडे, दागिने, वेगवेगळे खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या विविध वस्तू तसेच लहान मुलांसाठी विविध खेळ, खाऊ गल्ली इत्यादी उपलब्ध केली जाणार आहेत तरी नागरिकांनी या स्टॉलचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.